तरुण भारत
रविवार, दिनांक १५ फेब्रुवारी, २०१५

### जैवविविधता कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी

# जैव विविधता पंचायत परिषद आज

- महसूलमंत्र्यांचे हस्ते उद्‌घाटन
- विविध पुरस्कारांचे वितरण
- किशोर रिठे यांचे बीजभाषण

प्रतिनिधी

जळगाव, दि. १४ - वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवातील महत्वपूर्ण सत्र 'जैव विविधता पंचायत परिषद' उद्या दिनांक १५ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता कांताई सभागृहात आयोजित करण्यात आली आहे.

या परिषदेचे उद्‌घाटन महाराष्ट्राचे महसूलमंत्री नामदार एकनाथराव खडसे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. ज्येष्ठ वन्यजीव अभ्यासक व राज्य वन्यजीव मंडळ, राज्य जैवविविधता मंडळाचे सदस्य किशोर रिठे बीजभाषण देणार आहेत. या परिषदेमध्ये संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांचे अध्यक्ष, सचिव, सरपंच आणि ग्रामसेवक, सामाजिक कार्यकर्ते, पर्यावरणवादी इ. सहभागी होणार आहेत. जैव विविधता कायदा २००२ संमत झाल्यानंतर या कायद्यान्वये ग्रामपंचायत स्तरावर पान २ वर

## वसुंधरा सन्मान व वसुंधरा मित्र पुरस्कार!

▶ वसुंधरा महोत्सवातील पंचायत परिषदेच्या समारोपप्रसंगी या वर्षाच्या वसुंधरा सन्मान पुरस्कार शिरपूर पॅटर्नचे जनक सुरेश खानापूरकर यांना प्रदान करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे सर्पमित्र रवींद्र सोनवणे आणि पक्षीमित्र अश्विन पाटील यांना वसुंधरा मित्र पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

## जैव विविधता पंचायत...

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून लोक जैवविविधता नोंदवही करुन पंचक्रोशीतील जैवविविधतेचे संवर्धन करणे अपेक्षित आहे. परंतु या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होऊ शकलेली नाही. या पार्श्वभूमिवर पंचायत स्तरावर प्रबोधन करण्यासाठी पंचायत परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेत अधिकाधिक संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन संयोजक राजेंद्र नन्नवरे यांनी केले आहे. प्रसारमाध्यमांमधून प्रबोधनाचे कार्य करणारे पत्रकार जितेंद्र विसपुते, प्रदीप राजपूत, गोपाळ रोकडे, श्रीकांत जोशी, दिलीप तिवारी, विजय पाठक या पत्रकारांचा 'ग्रीन पुरस्कार' देऊन सन्मान करण्यात येणार आहे. वनअधिकाऱ्यांसाठी घोषित करण्यात आलेला वसुंधरा सृष्टी पुरस्कार यावल अभयारण्यासाठी व्यापक प्रयत्न करणारे गाडऱ्या-जामन्या वनपरिक्षेत्र अधिकारी निलेश गावंडे यांना देण्यात येणार आहे. तसेच ग्रीन टीचर पुरस्कारही देण्यात येणार आहे.